# पालकांसाठी मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी सूचना



आपल्या मुलांशी वारंवार बोलत रहा. त्यांच्या गृहपाठा व्यतिरिक्त पण त्यांच्यासाठी वेळ काढा. ज्या गोष्टींमुळे तुम्हां दोघांना आनंद प्राप्त होईल त्या करा.

संवाद साधणे म्हणजे नुसते बोलणे नव्हे तर ऐकणे सुद्धा, तुमच्या मुलाचं बोलणं ऐका त्यांच्या आयुष्यात काय चाललं आहे आणि दिनचर्याबद्दल माहिती जाणून घ्या.



तुमच्या मुलांच्या विचारांची, कल्पनांची आणि सामर्थ्यांची प्रशंसा करा, त्यांना प्रोत्साहन व मदत करा. निराश करणारी वक्तव्ये करू नका.

अनुशासनासाठी शारीरिक दंडाचा वापर न करता अन्य पर्यायांचा उपयोग करायला शिका. मुलांच्या कोणत्याही वागण्यामुळे राग आला असेल तर त्यावेळी त्यांच्याशी बोलू नये, तर शांत झाल्यावर त्यांच्याशी बोला.



मुलांना सांगा की, त्यांना 'नाही' म्हणण्याचा अधिकार आहे, त्यामध्ये त्यांच्याहून मोठया असलेल्या व्यक्तींचाही समावेश होतो. विशेषतः जेव्हा त्यांना अस्वस्थ व असुरक्षित वाटते.

मुलांना कोणत्याही असुरक्षित किंवा भीतीदायक अनुभवा बद्दल बोलायला प्रोत्साहन करा. त्यांना हे समजवा कि ते तुमच्याशी किंवा अन्य कोणत्याही मोठया व्यक्तीकडे मदत मागू शकतात.



आपल्या मुलांबरोबर विश्वसनीय व मोकळ्या विचारांचं नातं निर्माण करा.

**मुलांना हे नेहमी भासवून द्या की तुमचं त्यांच्यावर नितांत प्रेम आहे.**

**दूरध्वनी क्र.: 1800 267 2444**

**वेबसाईट: www.arpan.org.in**

**ऑनलाईन कोर्सेस: www.arpanelearn.com**

अर्पण

बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे